Historicity Research Journal                                        Impact Factor : 1.9152 (UIF)
ISSN : 2393-8900                                        Volume - 3 | Issue - 12 | Aug – 2017

# महापूर (जिल्हा लातूर येथील प्रथिमेचे शिवपिंड)

**समाधान भानुदास हाके**
**संशोधक विद्यार्थी एम.ए.एम.फील**



***प्रस्तावना :***

महापूर हे गाव लातूर तालुक्यापासून १२ कि.मी. अंतरावर आहे. या गावाचे क्षेत्रफळ १०१४.४० हेक्टर आहे. हे गाव माजरा नदीच्या डाव्या काठावर वसलेले आहे. गावापासून १ कि.मी. अंतरावर नामानंद महाराज देवस्थान आहे. महापूर गावाजवळ मांजरा नदीमध्ये कडेला महादेवाचे मंदिर आहे. हे मंदिर पूर्णपणे दगडामध्ये बांधलेले आहे. हे मंदिर साधार पध्दतीचे आयताकृती मंदिर आहे. या मंदिराचे बांधकाम मंडप व गर्भगृह या प्रकारात बांधकाम केलेले आहे. या मंदिराचे गर्भगृह हे २.१७× २.२० चौ. मी. आकाराचे आहे. हे मंदिर जमीनीपासून २ मीटर उंच व ४ मीटर रुंद आकाराचे आहे. या मंदिराच्या आतील छताचे बांधकामात तुळ्यांचा उपयोग केलेला आहे. मंदिराच्या वरील शिखराकडे जाणारा भाग हा चहुबाजूंनी निमुळता होत गेलेला दिसून येतो. यावरती घुमटाकाराचे शिखराप्रमाणे भाग आहे. पण त्याच्यावर कळस बसविलेला दिसून येत नाही. या मंदिराच्या गर्भगृहामध्ये शिवलिंग बसवीलेले आहे. हे शिवलिंग दक्षिणोत्तर दिशेमध्ये बसविलेले आहे. या मंदिरामध्ये एक शिवपिंड आहे. परंतु लिंगाची जागा सोडलेली दिसून येते. कदाचित पिंडीवरील लिंग तुटलेले असावे. या पिंडीवरील अभिषकाचे पाणी वाहून जाण्याकरिता जलनिर्गम खोलगट नाली केलेले आहे. या नालीची योजना प्रामुख्याने डावीकडे केलेली असून पूजेचे पाणी त्यातून मंदिराबाहेर सोडण्याची सोय केलेली आहे. ही पिंड दक्षिण-उत्तर दिशेस बसवलेली आहे. या मंदिराच्या दारासमोर नंदी बसविलेला आहे व त्याच्या बाजूला अजून एक शिवलिंग ठेवलेले दिसून येते.



**महादेव मंदिर - महापूर**

## मंदिरातील शिवपिंड

मांजरा नदीपात्रामध्ये एक महादेव मंदिर आहे. हे मंदिर हेमाडपंथी आहे. या मंदिरामध्ये एक शिवपिंड आहे. या पिंडीचे वैशिष्ट्ये म्हणजे या मोठ्या पिंडीवर १०८ शिवलिंग कोरलेले आहेत. या मोठ्या पिंडेच्या मध्यभागातील लिंग दिसून येत नाही. परंतु लिंगाची जागा सोडलेली दिसून येते. कदाचित पिंडीवरील लिंग तुटलेले असावे. या शिवलिंगाचा गोलाकार व्यास हा २ मीटरचा आहे. महापूर गावातील लोक नित्यनियमाने या मूर्तीची पूजा करतात. पूजा करण्यासाठी गावकऱ्यांनी एका ब्रम्हनाची नेमणुक केलेली आहे हे ब्रम्हन पूजारी सकाळी आणि सायंकाळी दररोज महादेवाची आरती व पूजा करतात. गावातील लोक ही आठवड्याच्या प्रत्येक सोमवारी देवदर्शनासाठी व पूजेसाठी यामंदिरामध्ये मोठ्या संख्येने येत असतात. श्रावण महीन्यामध्ये महापूर गावाबरोबरच लातूर तालुक्यातील अनेक गावातील लोक मोठ्या संख्येने या शिवलिंगाचे दर्शन व पूजेसाठी येत असतात. श्रावण महिन्यामध्ये मंदिराची सजावट व विद्युत रोषनाई केली जाते. अशाप्रकारची शिवलिंग सहसा कोठेही पाहावयास मिळालेले नाही. या शिवलिंगाचे एकदा दर्शन घेतल्यास ते १०८ वेळा दर्शन झाल्यासारखे होते असा गावाकऱ्यांच्यामध्ये विश्वास आहे. ही शिवलिंग दक्षिण उत्तर दिशेस बसवलेली आहे.



**शिवपिंड - महापूर**

## संदर्भ सुची

**१) लातूर जिल्हा प्रक्षेणीय स्थळे २०१०**

**२) गॅझेटीयर - माहिती व जनसंपर्क महासंचनालय मुंबई, लातूर २००८**